
# ज्ञानाच्या सरोवराचे पाट लोकांपर्यंत पोहोचावेत, म्हणून...

'मराठी संवर्धन पंधरवड्या'चे आज समापन होत आहे! त्यानिमित्ताने महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या वाटचालीचा आढावा!

**प्रा. रणधीर शिंदे**



ज्येष्ठ साहित्यिक

**भाषा साहित्य** संस्कृती वाटचालीत व्यक्तींबरोबरच संस्थात्मक कार्याचादेखील महत्त्वाचा सहभाग असतो. बऱ्याचदा अशा संस्थांचे कार्य दुर्लक्षिले जाण्याची शक्यता असते. एकोणिसाव्या शतकापासून विविध संस्थांनी मराठी भाषा, साहित्य, इतिहास, संस्कृतीविषयक महत्त्वाचे कार्य केले आहे. स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने महत्त्वाची कामगिरी बजावली आहे.

यशवंतराव चव्हाण यांच्या दूरदृष्टीतून १९६० साली महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना झाली. भौतिक संस्कृतीच्या विकासाबरोबर सांस्कृतिक जीवनाची भरभराट त्यांना महत्त्वाची वाटत होती. सांस्कृतिक जीवनाची इयत्ता वर्धमान होण्यासाठी पायाभूत स्वरूपाचे कार्य व्हावे, असे त्यांना वाटे. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ ही भारतीय पातळीवरील आरंभ काळात राज्य पातळीवरील पहिलीच साहित्यविषयक संस्था आहे. 'ज्ञानाच्या सरोवराचे पाट लोकांच्या जीवनापर्यंत पोहोचविले पाहिजेत, यासाठी भाषा, इतिहास व साहित्यासंबंधी मौलिक कार्य उभे करावे,' अशी यशवंतराव चव्हाण यांची इच्छा होती. १९५४ साली स्थापन झालेल्या साहित्य अकादमीची रचना व कार्य त्यांच्यापुढे असावे.

मंडळाच्या स्थापनेपासून आजपर्यंत भाषा, साहित्यासंबंधी विविध प्रकारची उल्लेखनीय पायाभूत स्वरूपाची कामे झाली आहेत. साहित्य, संस्कृती आणि इतिहास या विषयांवरील ग्रंथरचना, प्रकाशनाबरोबरच काळानुरूप विविध योजना मंडळाने सुरू केल्या. यामध्ये ललित आणि ललितेतर वाङ्मय प्रकाशनार्थ अनुदान, नवलेखक अनुदान योजना, नवलेखक कार्यशाळा, साहित्य संस्था व संमेलनांना अनुदान, नियतकालिके व साहित्यसंस्थांना मदत व विविध स्वरूपाचे पुरस्कार अशा त्या योजना आहेत.

नवोदित लेखकांच्या प्रथम प्रकाशन अनुदान योजनेतून अनेक नामवंत लेखकांची पुस्तके आजपर्यंत प्रसिद्ध झाली आहेत. अगदी अलीकडे २०१८ साली मंडळाच्या नव लेखक अनुदान योजनेतून प्रकाशित झालेल्या नवनाथ गोरे यांच्या 'फेसाटी' या कादंबरीस युवा साहित्य अकादमी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. गेल्या सत्तर एक वर्षांतील मंडळाची सर्वांत महत्त्वाची कामगिरी म्हणजे विविध स्वरूपाच्या मौलिक ग्रंथांची निर्मिती व त्यांचे प्रकाशन!

आधुनिक महाराष्ट्राच्या वाटचालीसंदर्भात महत्त्वाची ग्रंथप्रकाशने मंडळाच्या वतीने प्रकाशित झाली. महाराष्ट्राच्या समाज-संस्कृतीच्या इतिहासाचे काही एक मापन या लेखनातून झाले. यात एकोणिसाव्या शतकापासून ते विसाव्या शतकाच्या अखेरपर्यंतच्या काळातील महाराष्ट्रीय समाजाच्या वाटचालीविषयीचे काहीएक लेखन विविध प्रकारच्या ग्रंथांद्वारे झाले. आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या समाजसुधारक व विचारवंतांचे लेखन प्रकाशित झाले. समग्र वाङ्मय व निवडक वाङ्मयाचे खंड प्रसिद्ध झाले. लोकहितवादी, महात्मा फुले, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सयाजीराव गायकवाड, प्रबोधनकार ठाकरे, कृ. अ. केळुसकर, अण्णा भाऊ साठे, अमर शेख, नामदेव ढसाळ अशा विचारवंत लेखकांचे वाङ्मय प्रकाशित झाले. एका अर्थाने महाराष्ट्राच्या प्रबोधन परंपरेच्या विचारमंथनाबरोबर मराठी मनाचे भरणपोषण करण्याचे काम या वाङ्मयाने केले. याबरोबर दुर्मीळ वाङ्मयाचेदेखील प्रकाशन मंडळाने केले आहे. हस्तलिखिते, संतवाङ्मय, महानुभाव वाङ्मय, जैन वाङ्मय ते एकोणिसाव्या शतकातील काही लेखन तसेच पुनर्मुद्रण मंडळाने प्रकाशित केले आहे. यामध्ये ज्ञानोदयलेखनसारसूची खंड महत्त्वाचे होत. महाराष्ट्राच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या समाजसुधारकांची, विचारवंतांची चरित्रे 'शिल्पकार चरित्रमाला' या मालेद्वारे प्रकाशित करण्यात आली आहेत. तसेच महाराष्ट्राच्या इतिहासावरील काही मौलिक ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. आजवर मंडळाने पाचशेहून अधिक ग्रंथ प्रकाशित केले आहेत.

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या कार्यपद्धतीनुसार मंडळाचे अध्यक्ष व मंडळाच्या सदस्यांनी मंडळाच्या बैठकीत घेतलेल्या वाङ्मयीन धोरणात्मक निर्णयांची अंमलबजावणी मंडळाच्या प्रशासकीय यंत्रणेकडून केली जाते. मंडळाने गेल्या सत्तर वर्षांत प्रकाशित केलेल्या बहुविध ग्रंथांकडे नजर टाकली तर महाराष्ट्राच्या समाज, संस्कृती, इतिहास वाटचालीचे विहंगदर्शन घडते ज्याचे मूळ महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या ध्येयधोरणात दिसून येते. म्हणूनच आधुनिक महाराष्ट्राच्या साहित्यसंस्कृतीक्षेत्रात मंडळाने बजावलेली भूमिका अनन्य महत्त्वाची आहे.


# कर्करोगाचा धोका टाळता येणे शक्य..

## डॉ. पाटील यांचे 'नॅनो बायो मटेरियल बेस्ड सेंसर'मध्ये संशोधन

**नंदिनी नरेवाडी - पाटोळे :**
सकाळ वृत्तसेवा

आम्ही कोल्हापुरी

कोल्हापूर, ता. २७ : प्राथमिक अवस्थेत कर्करोगाचे निदान झाल्यास त्याच्यावर वेळीच उपचार करून रुग्णाला कर्करोगमुक्त करता येणे शक्य होते, यासाठी प्राथमिक अवस्थेतच कर्करोगाचे निदान करणारे सेंसर निर्मितीबाबत कोल्हापूरच्या डॉ. प्रशांत पाटील यांचे संशोधन सुरू आहे. 'नॅनो बायो मटेरियल बेस्ड सेंसर' या त्यांच्या संशोधनाला यश येताच


**डॉ. प्रशांत पाटील**

कर्करोगाचा धोका वेळीच टाळता येणे शक्य होणार आहे. संभाव्य कर्करोग रुग्णांच्या दृष्टीने हे संशोधन वरदान ठरणार आहे.

डॉ. पाटील यांना या संशोधनासाठी भारत सरकारच्या सायन्स अँण्ड टेक्नॉलॉजी विभागाकडून ३५ लाखांचा संशोधन प्रकल्प मंजूर झाला आहे.

सध्या ते न्यू कॉलेजमध्ये सहायक प्राध्यापक आहेत. डॉ. पाटील मुळचे कणेरी (ता. करवीर) चे. शिवाजी विद्यापीठातून भौतिकशास्त्र विषयातून त्यांनी पदव्युत्तर शिक्षण घेतले. एमएसस्सी पूर्ण झाल्यानंतर त्यांनी नेट (जेआरएफ), गेट, सेट या परीक्षा उत्तीर्ण झाले. तसेच भाभा अॅटोमिक रिसर्च सेंटर, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स या संस्थाय प्रवेश परीक्षाही ते उत्तीर्ण झाले. त्यानंतर त्यांनी आयआयटी, बॉम्बेमधून पीएच.डी.ला प्रवेश घेतला. तेथे त्यांनी कॉम्प्युटर हार्ड डिस्कमधील रिड हेड मटेरियल या विषयावर संशोधन केले. येथे पीएच.डी. मिळवल्यानंतर दक्षिण कोरियातील सेंटर फॉर नॅनो बायो इंजिनिअरिंग अँण्ड स्पिन्ट्रॉनिक्समध्ये पोस्ट डॉक्टरल रिसर्चची सुरवात केली.

### ४० शोधनिबंध प्रसिद्ध

डॉ. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली चार पीएच.डी.चे विद्यार्थी संशोधन करतात. या विद्यार्थ्यांचे मॅग्नेटिक मटेरियल फॉर डेटा स्टोरेज, हेवी मेटल आयन रिमुव्हल फ्रॉम वेस्ट वॉटर व डायग्नोसिस अँण्ड थेरपी ऑफ कॅन्सर यावर संशोधन सुरू आहे. त्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या नॅनोसायन्स विभातील १५ विद्यार्थ्यांना संशोधन प्रकल्पासाठी मार्गदर्शन केले आहे. त्यांचे नामांकित पब्लिकेशन्समध्ये ४० शोधनिबंध प्रसिद्ध आहेत.

# प्रत्येक नागरिकापुढे राज्यघटना खुली व्हावी

## प्रा. डॉ. पवार; कॉमर्स कॉलेजमध्ये 'यिन'तर्फे व्याख्यान

YOUNG INSPIRATORS NETWORK
Inspire. Network. Deliver

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २७ : 'भारतीय राज्यघटनेने दिलेल्या स्वातंत्र्याची मूळ जाणीव नागरिकांना नाही. आपले संविधान प्रत्येक माणसावर विश्वास ठेवते आणि त्याचे अस्तित्व मान्य करते. राज्यघटना माणसाच्या इच्छेचा विचार करते, संविधान व्यक्तीला विवेकाने वागायला शिकवते. हेच संविधान समजून घ्यायला आपण कमी पडत आहोत, यामुळे न्यायी समाजाची बांधणी होत नाही. राज्यघटना फक्त अभ्याक्रमापुरती मर्यादित राहिली आहे, ती प्रत्येक नागरिकापुढे खुली होणे गरजेचे आहे,' असे प्रतिपादन ज्येष्ठ राजकीय विश्लेषक प्रा. डॉ. प्रकाश पवार यांनी केले.

युवकांनी संविधानातून काय शिकले पाहिजे, या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी 'यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क' (यिन) तर्फे प्रजासत्ताक दिनानिमित्त देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉमर्स कॉलेजमध्ये झालेल्या व्याख्यानात ते बोलत होते. प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील अध्यक्षस्थानी होते. डॉ. एस. एफ. बोथीकर, डॉ. एस. एस. कदम, डॉ. आर. एस. नाईक प्रमुख उपस्थित होते. डॉ. पवार म्हणाले, "स्वतःचे



**कोल्हापूर : देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉमर्स कॉलेजमध्ये यिन तर्फे झालेल्या व्याख्यानात बोलताना प्रा.डॉ. प्रकाश पवार.**

प्रतिनिधीत्व निर्माण करण्याची संधी संविधानाने दिली आहे. मानवतावादाचे तत्त्व राज्यघटनेने दिले आहे. युवकांना राज्यघटनेचा अन्वयार्थ लावता आला पाहिजे. त्यासाठी त्यांनी संविधान वाचणे गरजेचे आहे. संविधानातून पुढे येणाऱ्या स्वातंत्र्य विचारांची जनजागृती 'सकाळ'च्या माध्यमातून 'यिन'सारख्या व्यासपीठावरून होत आहे, ही कौतुकाची बाब असल्याचेही ते म्हणाले.

तसेच या व्याख्यानाबद्दल विद्यार्थी संग्राम शिंत्रे, श्रद्धा फेफडे, साक्षी भांडवले, पराग हिर्डेकर, सुस्मिता धवन यांनी मनोगते व्यक्त केली. या कार्यक्रमाचे आयोजन यिनचे समन्वयक अवधूत गायकवाड यांनी केले.